**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय**

**गट क व ड भरतीच्या लेखी परीक्षेसंदर्भात अधिसुचना**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत व रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयातंर्गत विविध शासकीय संस्था / कार्यालयातील अनुक्रमे गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे भरण्यांसाठी जाहिरात अनुक्रमे जाहिरात क्र-1/2014 दिनांक 29/08/2014 व 13/09/2014 आणि जाहिरात क्र.रोस्वसं-2/आस्था/अराप/(03/10अ)/(1/2014) दिनांक 26/08/2014 अन्वये वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत आली होती.

शासन निर्णय क्र.कौविउ-2015/प्र.क्र.190/प्रशा-1 दि.02 सप्टेंबर, 2015 अन्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय हे विभाग कौशल्य विकास व उद्योजकता विभाग या विभागतंर्गत समाविष्ट करण्यांत आलेले असून शासन निर्णय क्र.कौविअ-2015/प्र.क्र.88/प्रशा-2 दि.01/07/2015 अन्वये रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाचे नामकरण **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय** असे करण्यांत आले आहे.

सदर पदभरतीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची संयुक्त लेखी परीक्षा **दिनांक 22/11/2015** रोजी खालील वेळापत्रकानुसार आयोजित करण्यांत आली आहे.

**परीक्षेचे वेळापत्रक.**

| **परीक्षा सत्र** | **वेळ** | **व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत पदभरती करावयाच्या पदाचे नाव** | **कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालयतंर्गत पदभरती करावयाच्या पदाचे नाव** |
|---|---|---|---|
| **सत्र-1** | स.10.00 ते 11.30 | शिल्प निदेशक, गणित निदेशक, चित्रकला निदेशक भांडार अधिक्षक, लघुलेखक (निम्नश्रेणी), सहाय्यक भांडारपाल/भांडार लिपिक, लघुटंकलेखक (मराठी), कनिष्ठ लिपिक / कनिष्ठ लिपिक-टंकलेखक. | लघुटंकलेखक, लिपिक टंकलेखक, |
| **सत्र-2** | दु. 13.00 ते 14.30 | ------------------- | शिपाई, चौकीदार / सफाईगार |
| **सत्र-3** | सांय.15.30 ते 17.00 | वरिष्ठ लिपिक | -------------------- |

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत भरावयाची खालील पदे सदर पदभरती प्रक्रीयेतुन वगळण्यांत आली आहे कृपया याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

1. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-1 अंतर्गत असलेली सर्व कंत्राटी पदे
2. नियमित वेतनश्रेणीतील प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद अंतर्गत शिल्पनिदेशक - फिजीओ थेरपी टेक्नीशियन व प्रादेशिक कार्यालय, नाशिक अंतर्गत शिल्पनिदेशक - पत्रे कारागीर व लघुलेखन (इंग्रजी) निदेशक ची पदे

वरील जाहिरातीनुसार अर्ज केलेले व अर्ज निश्चित केलेल्या उमेदवारांना संचालनालयामार्फत **www.dvet.gov.in** व **www.maharojgar.gov.in** या संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र (Admit Card ) डाऊनलोड करण्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. यासाठी उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेला मोबाईल नं.अथवा रजिस्ट्रेशन क्र.आणि जन्मतारीख याची नोंद (Entry) केल्यास संबंधीत उमेदवारास परीक्षा केंद्र, परीक्षा बैठक क्र.परीक्षा दिनांक, परीक्षा वेळ व सुचना इत्यादी तपशिलासह परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करुन प्रिंट घेता येईल. प्रवेश पत्रावर दिलेल्या सुचनांचे कोटेकोरपणे पालन करुन न चुकता उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाच्या सत्राच्या लेखी परीक्षेसाठी उपरोक्त नमुद दिनांक व वेळेत उपस्थित रहावे.

**विशेष सुचना:** ज्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज केला आहे, अशा उमेदवारांचे गुण त्या सत्रातील त्याने अर्ज केलेल्या प्रत्येक पदाच्या गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरण्यांत येतील.

**उमेदवाराला पदभरती संदर्भात कोणत्याही प्रकारची अडचण उदभवल्यास त्यांनी स.10.00 ते सां.6.00 वाजेपर्यत (दिनांक 11 व 13 नोव्हेंबर, 2015 वगळुन) मदतकक्षाच्या दुरध्वनी क्र.1860-233-0133 वर संपर्क साधावा.**

**सदर पदभरतीसंदर्भात पुढील सर्व सुचना वरील दोन्ही संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील त्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.**

सही/-
अध्यक्ष
गट क व ड पदभरती सनियंत्रण समिती,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व
कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई